महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालयातील सेवानिवृत्त अध्यक्ष/सदस्य व अधिनस्त सहकार न्यायालयातील न्यायाधीशांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मा.न्या.पी.व्ही.रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार सुधारीत सेवानिवृत्तीवेतन व तद्नुषंगिक बाबी लागू करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्र. सअन्या-०४२५/प्र.क्र.७२/५स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा :-</u> १. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.राजस-१५११/प्र.क्र.२०३/५स, दि.२६/८/२०११

२. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्र.एचसीटी-१२२२/१०६५/प्र.क्र.१६३ (भाग १) / का.३, दि.१८/८/२०२३

३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. जा. क्र. मरासअन्यामुं/२८१/२०२४,दि.२२/०२/२०२४

**<u>प्रस्तावना:-</u>**

माननीय सर्वोच्च न्यायालयातील रीट याचिका (दिवाणी) क्रमांक ६४३/२०१५, अखिल भारतीय न्यायिक अधिकाऱ्यांची संघटना विरुध्द केंद्र शासन व इतर या प्रकरणात दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांच्या वेतन श्रेणीत सुधारणा करण्यासाठी व इतर भत्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाची मा. न्या. पी. वेंकटरामा रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना केली. दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने या संदर्भात त्याचा अहवाल जानेवारी, २०२० मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात सादर केला. .

२. मा. सर्वोच्च न्यायालयातील रीट याचिका क्रमांक ६४३/२०१५, या प्रकरणातील दिनांक १९.०५.२०२३ रोजीच्या आदेशानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने दुय्यम न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना द्यावयाच्या सुधारीत निवृत्तीवेतनाबाबत व इतर लाभाबाबत केलेल्या शिफारशी स्विकारुन सदर शिफारशींची अंमलबजावणी दिनांक १.१.२०१६ पासून करण्याबाबत तसेच थकबाकीची रक्कम तीन हप्त्यांत अदा करण्याबाबत सर्व राज्य शासनांना निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने विधि व न्याय विभागाने संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील दुय्यम न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार सुधारीत सेवानिवृत्तीवेतन व तद्नुषंगिक बाबी लागू केल्या आहेत. त्यानुसार अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालयातील सेवानिवृत्त अध्यक्ष/सदस्य व अधिनस्त सहकार न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मा.न्या.पी.व्ही.रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार सुधारीत सेवानिवृत्तीवेतन व तद्नुषंगिक बाबी लागू करण्याबाबत संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये विनंती केली होती.

त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालयातील सेवानिवृत्त अध्यक्ष/सदस्य व अधिनस्त सहकार न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मा.न्या.पी.व्ही.रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार सुधारीत वेतन लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने दुय्यम न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना सुधारीत निवृत्तीवेतनाबाबत व इतर लाभांबाबत केलेल्या शिफारशी विधी व न्याय विभागाने दिनांक १८.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्विकारल्या असून त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालयातील सेवानिवृत्त अध्यक्ष/सदस्य व अधिनस्त सहकार न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशांना लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासन याव्दारे खालील प्रमाणे मंजूरी देत आहे.

**अ) दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या / सेवेत असताना मृत्यु पावलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना / त्यांच्या कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दि.०१.०१.२०१६ पासून खालील लाभ अनुज्ञेय राहील:-**

१. दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या / सेवेत असताना मृत्यु पावलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांचे / त्यांच्या कुटुंब निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तीवेतन / कौटुंबिक निवृत्तीवेतन खालील प्रमाणे निश्चित करावे:-

(i) निवृत्तिवेतनधारकांच्या विद्यमान निवृत्तिवेतनास (यामध्ये महागाई भत्त्याचा समावेश नसेल) २.८१ ने गुणावे. (Formulation -I)

किंवा

सेवानिवृत्त झालेले न्यायिक अधिकारी यांना त्यांनी सेवानिवृत्तीच्या वेळी घेतलेल्या शेवटच्या वेतनाच्या आधारे फिटमेंट टेबलमधील (Annexure A) संबंधित टप्प्यावर काल्पनिकरित्या ठेवण्यात यावे. फिटमेंट टेबलनुसार येणाऱ्या प्रस्तावीत वेतनाच्या ५०% निवृत्तीवेतन व ३०% कौटुंबिक निवृत्तीवेतन असेल (Formulation-II),

यापैकी जी रक्कम जास्त लाभदायक असेल ती रक्कम निवृत्तीवेतन म्हणून अनुज्ञेय असेल.

(दि.०१.०१.१९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या राज्यातील दुय्यम न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांचे निवृत्तीवेतन निश्चित करण्याबाबत प्रथमतः विधि व न्याय विभागाच्या शासन निर्णय क्र.एचसीटी-१२२०/१२९/प्र.क्र.१५/का.तीन, दि.१५.०३.२०२३ अन्वये कार्यवाही करण्यात यावी व त्यानंतरच उपरोक्त प्रमाणे सुधारीत करावे.)

(ii) ज्या पध्दतीने निवृत्ती वेतनाचे प्रमाण ठरवले जाते, त्याच पध्दतीने कौटुंबिक निवृत्ती वेतनाचे प्रमाण ठरविले जाईल.

(iii) केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९७२ मधील नियम ५४ मध्ये दिल्याप्रमाणे जोडीदाराचा मृत्यू झाल्या नंतर जोडीदाराच्या बरोबरीने कुटुंबातील पात्र सदस्यांना ३०% कौटुंबिक निवृत्तीवेतन निश्चित करण्यात यावे.

(iv) कौटुंबिक निवृत्ती वेतन मिळविण्यासाठी पात्र असलेले अवलंबित कुटुंबातील सदस्यांना (जोडीदाराशिवाय) कौटुंबिक निवृत्ती वेतन दर महिना रु. ३०,०००/- पेक्षा कमी निश्चित होत असल्यास ते किमान रु. ३०,०००/- इतके निश्चित करण्यात येईल.

(v) दि.०१.०१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ मिळण्यासाठी त्यांनी सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय या पदावरील सेवेपूर्वी केलेल्या वकीली व्यवसायातील कमाल १० वर्षाचा कालावधी ग्राह्य धरण्यात येईल. त्यासाठी त्यांची सलग १० वर्षाची न्यायिक सेवा असणे बंधनकारक आहे.

२. उपरोक्त सुधारीत लाभ हे दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेले अथवा सेवेत असतांना मृत्यू पावलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना / त्यांच्या कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना लागू असून ते सुधारीत लाभ हे दि.१.१.२०१६ पासून लागू होतील.

**ब) दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या / झालेल्या सेवेत असताना मृत्यु पावलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना त्यांच्या कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दि.०१.०१.२०१६ पासून खालीलप्रमाणे लाभ अनुज्ञेय राहील:-**

I. सेवानिवृत्तीच्या वेळी शेवटच्या महिन्यात घेतलेल्या सुधारीत मुळ वेतनाच्या ५०% निवृत्तीवेतन व ३०% कौटुंबिक निवृत्तीवेतन असेल.

II. दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना संपूर्ण सेवानिवृत्ती वेतनाचा लाभमिळण्यासाठी किमान २० वर्षाचा अर्हताकारी सेवा कालावधी आवश्यक राहील. तसेच किमान निवृत्तीवेतन मिळण्यासाठी न्यायिक अधिकाऱ्यांची किमान १० वर्ष अर्हताकारी सेवा आवश्यक राहील.

III. न्यायिक अधिकाऱ्यांसाठी निवृत्तीचे वय पूर्वी प्रमाणेच म्हणजे ६० वर्ष असेल.

IV. निवृत्ती वेतनाच्या अंशराशीकरणाची मर्यादा ही निवृत्तीवेतनाच्या ५०% इतकी असेल व निवृत्तीवेतन पुनःस्थापित करण्यासाठी १५ वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

V. केंद्रीय नागरी सेवा (पेन्शन) नियम १९७२ मधील नियम ५० (१) (ए) मध्ये दिलेल्या मृत्यु-नि-सेवानिवृत्ती उपदानाची तरतूद न्यायिक अधिकाऱ्यांना लागू राहील. मृत्यु-नि-सेवानिवृत्ती उपदानाची कमाल मर्यादा रु. २० लाख एवढी राहील. तसेच जेव्हा जेव्हा महागाई भत्ता ५०% ने वाढेल तेव्हा तेव्हा मृत्यु-नि-सेवानिवृत्ती उपदानाची मर्यादा २५% ने वाढेल.

VI. दिनांक ०१.०१.२०१६ नंतर सेवानिवृत्त झाल्यावर पूर्वीच्या कमाल मर्यादेनुसार सेवानिवृत्ती उपदान अदा केलेल्या अधिकाऱ्यांना, त्यांचे वेतन सुधारणेमुळे उपदानाबाबतचा देय असलेला फरक हा सुधारित कमाल मर्यादेच्या अधीन राहून अदा केला जाईल.

VII. मृत्यू उपदान अर्हताकारी सेवेच्या आधारावर खालील तक्त्यानुसार दिले जावे.

| **अर्हताकारी सेवेचा कालावधी** | **मृत्यू उपदानाचा दर** |
|---|---|
| सेवा १ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या दुप्पट |
| सेवा १ वर्षापेक्षा जास्त व ५ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या ६ पट |
| सेवा ५ वर्षापेक्षा जास्त व ११ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या १२ पट |
| सेवा ११ वर्षापेक्षा जास्त व २० वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या २० पट |
| सेवा २० वर्षापेक्षा जास्त | अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी अंतिम वेतनाच्या निम्मे मात्र अंतिम वेतनाच्या ३३ पटीच्या मर्यादेत. |

VIII. केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९७२ मधील नियम ५४ मध्ये दिल्याप्रमाणे जोडीदाराचा मृत्यू झाल्या नंतर जोडीदाराच्या बरोबरीने कुटुंबातील पात्र सदस्यांना ३०% कौटुंबिक निवृत्तीवेतन निश्चित करण्यात यावे.

IX. कौटुंबिक निवृत्ती वेतन मिळविण्यासाठी पात्र असलेले अवलंबित कुटुंबातील सदस्यांना (जोडीदाराशिवाय) कौटुंबिक निवृत्ती वेतन दर महिना रु. ३०,०००/- पेक्षा कमी निश्चित होत असल्यास ते किमान रु. ३०,०००/- इतके निश्चित करण्यात यावे.

X. ज्या न्यायिक अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्ती दिनांकाच्या पुढील दिवशी (Next day) वेतनवाढ देय असेल, त्यांना वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील. तथापि तो लाभ केवळ निवृत्तीवेतनासाठी अनुज्ञेय राहील आणि सदर लाभ हा रु.२,२४,१००/- इतक्या वेतनाच्या कमाल मर्यादेच्या अधीन असेल.

**क) अतिरिक्त निवृत्तीवेतन / कौटुंबिक निवृत्तीवेतन :**

१. सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना अतिरिक्त निवृत्तीवेतन / कौटुंबिक निवृत्तीवेतनाचे लाभ दि.०१.०१.२०१६ पासून पुढील प्रमाणे वय पूर्ण झाल्यावर लागू राहील:-

| **निवृत्तीवेतन धारक / कौटुंबिक निवृत्तीवेतन धारकाचे वय** | **निवृत्तीवेतन/ कौटुंबिक निवृत्तीवेतनाचे अतिरिक्त प्रमाण** |
|---|---|
| ७५-८० वर्षे | २०% |
| ८०-८५ वर्षे | ३०% |
| ८५-९० वर्षे | ४०% |
| ९०-९५ वर्षे | ६०% |
| ९५-१००वर्षे | ८०% |
| १०० वर्षे पूर्ण झाल्यावर | १००% |

**ङ) मृत्यु झाल्यास आर्थिक मदतः-**

I. केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२ मधील नियम ५४(३) मध्ये दिनांक १९.०९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना कुटुंब निवृत्ती वेतनाचा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

II. राज्यांमध्ये आधीपासूनच लागू असलेले मृत्यू उपदानासह इतर फायदे जसे की एक वेळचे एकरकमी अनुदान, अनुकंपा नियुक्ती, शासकीय निवासस्थानामध्ये राहण्याची परवानगी इ. लाभ यापूढेही लागू राहतील.

२. दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने शिफारस केलेल्या सुधारित निवृत्तीवेतनावर केंद्र शासनाच्या दराप्रमाणे महागाई भत्ता अनुज्ञेय राहील.

३. विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र. एचसीटी १११८/प्र.क्र.३०/का-३, दि.२१.०६.२०१८ नुसार राज्यातील दुय्यम न्यायालयातील सर्व संवर्गातील न्यायिक अधिकाऱ्यांना दि.०१.०१.२०१६ पासून मूळ वेतनामध्ये ३० टक्के अंतरिम वेतन वाढ म्हणून देण्यात आलेली आहे. यास्तव निवृत्तीवेतन/कौटुंबिक निवृत्तीवेतन निश्चिती करतांना सदर ३० टक्के दिलेली अंतरिम वेतनवाढ समायोजित करुन उर्वरित थकबाकीची रक्कम रोखीने अदा करण्यात यावी.

४. सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना द्यावयाचे सुधारीत निवृत्तीवेतन/कौटुंबिक निवृत्तीवेतन हे रोखीने दिनांक ०१.०७.२०२३ रोजी पासून द्यावे व थकवाकीपोटी देय होणाऱ्या रक्कमेपैकी २५% रक्कम दि.३१.०८.२०२३ रोजीपूर्वी, २५ % रक्कम दि.३१.१०.२०२३ रोजीपूर्वी व ५० % रक्कम दि.३१.१२.२०२३ रोजीपूर्वी रोखीने देण्यात यावी.

५. सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांचे निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन सुधारित करण्याची कार्यवाही विधि व न्याय विभागाच्या दि.२५.०७.२०११ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार करण्यात यावी.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग व्यय-२ च्या अनौपचारिक संदर्भ क्र.३५९/२०२६/व्यय-२, ६/६/२०२६ च्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याच संकेताक क्रमांक २०२६०८२११२३३०७९१४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL DEORAM AGARKAR

Digitally signed by SUNIL DEORAM AGARKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=BD05F4FDBBB9ED343F1BE2CAF44A80E981A9AAAA980ED10ED0E2772DFCCA67CC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=01A0A8594022E4572C9EE1F979883E0867C70D25B214D7205F60D0D0F23484C9, cn=SUNIL DEORAM AGARKAR
Date: 2026.08.21 12:34:15 +05'30'

**( सुनिल आगरकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. मा.सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य.

६. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

९. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई/औरंगाबाद/नागपूर.

१०. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई/औरंगाबाद/नागपूर.

११. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई.

१२. सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.

१३. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४. सर्व सहकारी न्यायालये, द्वारा :- महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई.

१५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

१६. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.

१७. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.

१८. अवर सचिव (१७स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९. वित्त विभाग (सेवा-९/व्यय-२), मंत्रालय, मुंबई.

२०. मा.प्रधान सचिव (सहकार व पणन), यांचे स्वीय सहाय्यक.

२१. मा.प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.

२२. निवडनस्ती-५स.